प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)
(०२३५८) २८२३८७

अंक ०७/२०१८ दिनांक २५/०१/२०१८ कालावधी ५ दिवस

| | | |
|---|---|---|
| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. ज्ञानेश्वर जगताप,** | **प्रा. विरेश चव्हाण,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४०३९८८१४३ | ९४२२०६५३४४ |

| मागील हवामान सारांश दि. २१/०१/२०१८ ते २५/०१/२०१८ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

| हवामान पूर्वानुमान (२६/०१/२०१८ सकाळी ८:३० पासून ३०/०१/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **हवामानांचे घटक** | : | २६/०१ | २७/०१ | २८/०१ | २९/०१ | ३०/०१ |
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | २७ | २९ | २८ | २८ | ३० |
| किमान तापमान (अं.से) | : | १७ | १८ | १८ | १८ | १९ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | १ | ४ | ३ | १ | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ५५ | ५५ | ५७ | ५७ | ५८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ३० | २६ | २८ | २८ | २९ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००५ | ००४ | ००४ | ००५ | ००६ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक २६ ते २९ जानेवारी २०१७ पर्यंत अवकाश अंशत: मेघाच्छादित राहिल. दिनांक २६ ते ३० जानेवारी, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ४ ते ६ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | रोपवाटीका | • रब्बी–उन्हाळी हंगामात भात पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी भात पीक रोपवाटिकेची पेरणी करून १५ दिवस झाले असल्यास रोपवाटिकेस प्रति गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया खताचा दुसरा हप्ता द्यावा. |
| **कडधान्य पिके** | **वाढीची अवस्था** | • वाल, चवळी, कुळीथ इ. पीकांवर मावा व पाने पोखरणारी अळी या किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच त्याच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट १५ किंवा लॅम्बडा सायहेलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **आंबा, काजू** | **वाढीची अवस्था** | • किमान तापमानातील बदलामुळे हापूस आंब्यास परत परत येणारा मोहोर टाळण्यासाठी जिब्रेलिक ॲसिड ५० पी.पी.एम. ची (१ ग्रॅम २० लि. पाण्यात मिसळून) फवारणी करावी.<br>• आंबा बागांमध्ये तुडतुडयांचा प्रादुर्भाव झाल्यास त्याच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मिली तसेच भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी हेक्झाकोनॅझोल ५ टक्के ५ मिली किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>• काजूवर ढेकण्याचा (टी मॉस्किटो) प्रादुर्भाव झाल्यास त्याच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ टक्के प्रवाही ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून नवीन पालवी फुटण्याच्यावेळी फवारणी करावी.<br>(सदर नमुद केलेले किटकनाशक लेबलक्लेम नाही.) |
| **नारळ/ सुपारी** | –– | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्ड्यात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला आणि कलिंगड लागवड** | | • भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.<br>• कलिंगड पिकामध्ये मर (वेली संपूर्ण सुकून जातात) या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, कार्बेन्डॅझिम १ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात वेलीच्या बुंध्याशी ओतावे.<br>• कलिंगड वेलीच्या सभोवती सुक्या गवताचे किंवा प्लॅस्टिकचे आच्छादन करावे. |
| **दुभती जनावरे/ शेळया** | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• किमान तापमान कमी होत असल्यामुळे गुरांच्या गोठयात तसेच कोंबडयाच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्प आणि शेडभोवती पडदे गुंडाळावेत. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |